या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार २८ जूले २०२४ | अंक२३१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# मराठा समाजाला कोण उल्लू बनवतंय?
# मनोज जरांगे पाटील यांचा नाव घेऊन आरोप

अनेक आंदोलने केली, मोर्चे काढले अन् उपोषणेही केली. सरकारला डेडलाईनवर डेडलाइन दिल्या पण मराठा समाजाला काही आरक्षण मिळालं नाही. त्यामुळे मराठा समाजात असंतोष खदखदत आहेत. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी मोठं विधान केलं आहे.

मराठा समाजाला कोण उल्लू बनवतंय याची माहितीच जरांगे यांनी केली आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही मराठा समाजाला उल्लू बनवत असल्याचा गंभीर आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. जरांगे यांनी हा आरोप करून एक प्रकारे सत्ताधारी आणि विरोधकांवर अविश्वासच दाखवला आहे.माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन मराठा आणि ओबीसी आरक्षणावर चर्चा केली. त्यावर मनोज जरांगे पाटील यांनी भाष्य केलं आहे. ही फक्त घुमावघुमवी आहे. मराठा समाजाची दिशाभूल करण्याचं काम



आहे. या दोघांनी मिळून आरक्षण द्यायला हवे. आरक्षण द्यायला काहीच लागत नाही. मनात असेल तर काही करता येतं, मनात असेल तर देता येते, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. इंग्रजी माध्यमातच जाणारी मुलं हुशार आहेत असं काही नाही. अव्वलमध्ये येणारी अनेक मुलं जिल्हा परिषदेतील आहेत. इंटरनॅशनल स्कूलचा भारतीय शिक्षणव्यवस्थेशी किती संबंध आहे याची मला शंका आहे. एकाच वेळी आपण ४० लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घेतो, हा जगात रेकॉर्ड आहे," असंही ते म्हणाले. सगळे वेड्यात काढत आहेतत्यांनी लाईव्ह बैठक घेण्यापेक्षा डोंगरावर जाऊन मोठ्याने बोलावं आणि त्याचं लाईव्ह प्रेक्षेपण करावं. यांच्या कुठेही भेटी होतात. मात्र आरक्षणासाठी बोलत नाहीत. तेवढं त्यांना जमत नाही आणि म्हणतात आम्ही लाईव्ह करायचं. 70 वर्षापासून सगळे वेड्यात काढत आहेत. लोकांच्या मनांत अती खदखद आहे. लोकांना समजते की आपल्याला कोण उल्लू बनवतंय. विरोधक आणि सत्ताधारी हे मराठ्यांना उल्लू बनवत आहेत, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला.

## समाजाने हमाल्याच करायच्या का?

**मराठ्यांना आरक्षण मिळू नये हा राजकीय लोकांचा डाव आहे. त्यांना मराठे मोठे व्हावेत असं वाटत नाही. समाजाला काही माहिती हवी असेल किंवा राजकीय नेत्यांना काही माहिती हवी असेल तर सर्व लाईव्ह आहे. नेते म्हणाले आम्हाला काही माहीत नाही तर सर्व त्यात आहे. सत्ताधारी आणि विरोधक गैरसमज पसरवणाऱ आहेत. माझ्या समजाने नेत्यांच्या हमाल्याच करायच्या का? विरोधी पक्ष आणि सत्ताधारी हे नाटक करत आहेत. समाजात गोंधळ आणि गैरसमज पसरवण्याचे षडयंत्र सुरू आहे. समाजाला वेड्यात काढण्यासाठीच हा चालूपणा आहे, असा आरोप जरांगे यांनी केला.**

## यांचा जीव खुर्चीत

**सत्ताधारी आणि विरोधक हे कुणाचेही नाहीत. न्याय मिळवून द्यायचा असेल तर एकत्रित या. आमचा जीव आरक्षणात आहे. यांचा जीव खुर्चीत आहे. आरक्षण नाही दिले तर आम्ही सत्ता येऊ देणार नाही. तुम्ही देणार नसाल तर आम्हाला पाडापाडी करावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला.**

## एकाचे दोन सांगतात

**यावेळी त्यांनी प्रवीण दरेकर यांच्या टीकेला उत्तर देणं टाळलं. मला त्यांच्यावर बोलायचं नाही. आमचं ध्येय आरक्षण मिळविणं आणि पाडापाडी करणं आहे. त्यांच्या आजू बाजूचे लोक त्यांना समजावून सांगत नाहीक, जवळील लोक एकाचे दोन सांगतात. फुकटात निवडून येणारे मिसगाईड करतात. मागील दाराने लोक गैरसमज निर्माण करतात. पण हे मराठ्यांच्या लाटेत होरपळून जाणार आहेत. नेत्याला खुश करावे लागते, अन्यथा दुसऱ्या वेळी मिळत नाही. मूळ मालकाचा कार्यक्रम असतो. असं अनेकदा घडतं, असा टोला त्यांनी लगावला.**

# दैनिक वृत्तपत्र संघटना महाराष्ट्र राज्याच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक मेंहकर येथे संपन्न

**बीड प्रतिनिधी ,**

मेहकर येथे आज बैठक घेऊन या बैठकीमध्ये विविध प्रकारच्या विषयावर चर्चा करण्यात आली प्रथम वृत्तपत्रस्वातंत्र्याचे रक्षण करणे . पत्रकारांचे हितसंबंध जोपासणे . त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न करणे . त्याचबरोबर पत्रकारांचे हित जोपासण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे . त्यांच्या व्यावसायिक उत्पन्न वाढीसाच्या प्रश्नात लक्ष घालून ते सोडविण्याचे प्रयत्न करणे इत्यादी . अनेकविध उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून स्थापन करण्यात आलेल्या दैनिक वृत्तपत्र संघटना महाराष्ट्र राज्य ही संघटना राज्यभर कशी




वाढवता येईल यासाठी प्रयत्न करून वृत्तपत्राच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी संपादकांनी पुढाकार घेणे ही प्रत्येक संपादकाची नैतिक जबाबदारी आहे आसे आवाहन 27 जुलै 2024 रोजी शासकीय विश्रामगृह डोणगाव रोड मेहकर येथे झालेल्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विदर्भ सत्यजित चे संपादक उद्धव फंगाळ यांनी केले . या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संपादक तथा संघटनेचे अध्यक्ष देविदास खनपटे . संपादक सादिक कुरेशी . संपादक अन्सार भाई . संपादक अकुश राठोड . संपादक निलेश काळे . इत्यादी संपादकासह अनेक पत्रकार उपस्थित होते यावेळी संघटनेचे मेहकर येथे मुख्य कार्यालयाचे उद्धघाटन करणे प्रत्येक पेपरचा अंक छपाईसाठी संघटनेचा छापखाना सुरू करणे त्याचबरोबर महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात संघटनेची कार्यकारणी गठित करणे . यासह अनेक विषय यावेळी चर्चेला घेण्यात आले . या बैठकीत सर्व संपादकांनी आपापली मते व्यक्त केली

## सेलु तांड्यावर जाण्यासाठी मुख्य रस्ताच नाही,स्थानिक आमदार प्रशासनाचे दुर्लक्ष.

### ग्रामस्थांचा येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय.



**बीड प्रतिनिधी अंकुश गवळी**

गेवराई तालुक्यातील सेलू तांडा या ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून मुख्य रस्ता गावाला नाही. याकडे ग्रामस्थांनी अनेकदा पाठपुरावा करून देखील या रस्त्याचे काम चालू झाले नाही. येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जर आमच्या गावचा रस्ता जर नाही झाला. येणाऱ्या काळामध्ये आम्ही ग्रामस्थ मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले,

# उघडे पडलेल्या जगताप कुटूंबाला तेजस चा मदतीचा हात:
# सुरेश आण्णा अपघात योजनेंतर्गत दिला चार लाखाचा धनादेश

**बीड/प्रतिनिधी:** ऊसतोडीच्या कामासाठी गेलेल्या बाळू जगताप आणि महादेव जगताप (रा.डोमरी, ता.पाटोदा) येथील दोन्ही बंधूंचा अपघातात मृत्यू झाला होता. यातील मयत बाळू जगताप हे तेजस अर्बन संस्थेचे सभासद असल्याने या बँकेने त्यांच्या वारसांना चार लाख रूपयांचा मदतीचा हात दिला आहे. 'मा.सुरेश आण्णा ' अपघात योजनेतून ही मदत शनिवारी करण्यात आली. तेजस अर्बन संस्थेने जिल्हाभरात जाळे निर्माण केलेले असून सभासद असलेल्यांच्या कुटूंबियांना अचानक मृत्यूमुळे येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून सभासदांचा मा.सुरेश आण्णा , या नावाने अपघात विमा उतरविला आहे. यातून ही मदत करण्यात येत आहे. काही महिन्यांपुर्वी डोमरी येथील बाळू लक्ष्मण जगताप आणि महादेव जगताप या दोन्ही मुकादम बंधूंचा ऊसतोडीच्या कामासाठी सातारा जिल्हातील साखर कारखान्यावर गेल्यानंतर दुचाकी अपघातात मृत्यू झालेला होता. दरम्यान, बाळू जगताप यांची आर्थीक परस्थिती हालाखीची असून ते तेजस अर्बन संस्थेचे सभासद आहेत. सदरील बाब लक्षात घेवून संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कवठेकर यांनी जगताप कुटूंबियांना मदतीचा हात देण्याच्या हेतूने चार लाख रूपयाचा विमा कवच मिळून



दिले आहे.मयत सभासद बाळू लक्ष्मण जगताप यांच्या वारसदार अनिता बाळू जगताप यांना संस्थेकडून मा.सुरेश आण्णा अपघात योजने अंतर्गत चार लक्ष रुपये मदतीचा धनादेश माजी मंत्री सुरेश धस यांच्या हस्ते शनिवारी आष्टी येथे देण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अॅड.प्रकाश कवठेकर, युवा नेते जयदत्त धस, संचालक रामदास ठोसर, शिवाजी लोंखंडे, बाबुराव कदम, माजी सभापती रामकिसन भोंडवे, विनोद रोडे, भाऊदादा निंबाळकर, अशोक सुपेकर, पोपट कोल्हे, दादासाहेब जगताप, जनार्धन भोंडवे, संस्थेचे अधिकारी सचिन घिगे, संतोष नाटकर, गोरख पांचाळ सह आदी उपस्थित होते. माझे पती यांचे अचानक निधन झालेले असल्याने कुटूंब उघडे पडलेले आहे. या दुखातून बाहेर निघणे शक्य नाही परंतु माझ्या लेकरांच्या भविष्याचा विचार करून तेजस अर्बन बँक आमच्यासाठी देवासारखी धावून आलेली आहे. अशावेळी मिळालेली ही मदत आमच्यासाठी खूप मोठी आहे. -अनिता जगताप, मयताची पत्नी, डोमरी. तेजस अर्बन संस्थेने मागील कालाधवीत अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतलेला आहे. सभासद जिवंत असताना त्यांच्यासोबत संस्था असतेच परंतु दुर्देवाने काही अपघात घडलाच तरीही संस्थेने त्यांच्या कुटूंबियांच्या सोबत संस्थेने असले पाहिजे, हे तेजस अर्बनने दाखवून दिले आहे. अशाच पध्दतीने सर्व संस्थांनी विमा उतरविणे आवश्यक आहे. -मा.मंत्री.सुरेश धस, आष्टी, मतदारसंघ.

# केज विधानसभेत भाजपाला काँग्रेसचे तगडे आव्हान आमदार नमिता मुंदडा समोर उच्चशिक्षित दत्ता कांबळे!

## सर्वसामान्यांना काँग्रेसच्या पंजा ची प्रतीक्षा

जिल्हातील लोकसभा क्षेत्रात गेली पंचवीस ते तीस वर्षांपासून निवडणुकीत काँग्रेसला कधी युतीमुळे तर कधी गटबाजीमुळे काँग्रेसला निवडणुकीत बॅलेट वर पंजा हे चिन्ह न आल्याने, काँग्रेस पक्षाला मानणारा वर्गाचा नाविलाज होत असे, परंतु आत्ता बॅलेट वर अनेक वर्षांनी काँग्रेसचे पंजा चिन्ह आले तर सर्वसामान्य लोकांची मत देण्यासाठी उत्सुकता वाढणार असल्याचे चित्र दिसून येत आहे

## मतदार संघावर काँग्रेसचा दावा :बातमी वाऱ्यासारखी पसरली

काही दिवसांपूर्वी माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस पक्षाची आढावा बैठक पार पडली होती. या बैठकीत काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी केज मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरला होता ही बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि सर्वसामान्य लोकांची जणभावना समोर आली.

## दत्ता कांबळे हें उच्चशिक्षीत व सर्वसमावेशक चेहरा

**काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे हे एम. ए. एम. फिल शाखेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद /छत्रपती संभाजी नगर येथून शिक्षण पुर्ण केलेले असून,आमदार नमिता मुंदडा यांच्या तुलनेत कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला,मात्र आंबेडकरी चळवळीतून आपली एक वेगळी आणि सर्वसमावेशक छबी निर्माण करणारा समाजाप्रती प्रमाणिक असणारा कार्यकर्ता म्हणून ओळख आहे. मतदार संघातील खासदार रजनी पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांचे निष्ठावंत म्हणून तर ओळख आहेच, परंतु मतदार संघात प्रभाव असणारे, सर्वपक्षीय नेत्यांच्या विविध लोककल्यानाचे विविध प्रश्न घेऊन कायम संपर्कात असणारा कार्यकर्ता व सर्वपक्षीय नेत्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ही दत्ता कांबळे यांची मोठी जमेची बाजू आहे.**

## खासदार सौ. रजनी पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील यांचा देशात प्रभाव

राज्यसभेच्या खासदार सौ. रजनी पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील यांचे गांधी परिवारा सोबत कौटुंबिक सौख्य असून, पक्षात देशातील राजकारणावर प्रभाव असून, पक्षात जोरदार पकड आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडी धर्म पाळत बिनशर्त राष्ट्रवादी शरदपवार पक्षाचा उमेदवार निवडून आणल्यानं, आत्ता लोकसभा क्षेत्रातील सर्वाधिक जागा महाविकास आघाडीत काँग्रेस पक्षाला खेचून आणण्याची ताकद माजी मंत्री अशोकराव पाटील व खासदार सौ. रजनी पाटील यांच्यात असल्याचे सर्वश्रुत आहेच आणि वेळोप्रसंगी जर काँग्रेस पक्षाला सन्मानजनक जागा नाही मिळाल्या तर या दोन्ही दिग्गज नेत्यांनी स्वतंत्र काँग्रेसच्या पंजा या चिन्हावरच निवडणूक लढण्याचे आदेश स्थानिक कार्यकर्त्यांना दिले आहेत. त्याच्यामुळे विद्यमान आमदार असणाऱ्या सत्ताधारी भाजपाला काँग्रेसचे मोठे आवाहन असल्याचे दिसून येत आहे

## उमेदवार बाहेरचाही चालेल परंतु सर्वसामान्य घरातील असावा

मतदार संघात आजी माजी आमदार हे स्वार्थी निघालेले असून, पैश्यातून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा हे सूत्र अवलंबून सर्वसामान्य स्थानिकांची घोर निराशा आजी माजी आमदार यांनी केल्यामुळे, आत्ता उमेदवार बाहेरचा असला तरी चालेल परंतु सर्वसामान्य कुटुंबातील असावा असा मतदार संघातील जनतेचा सुर आहे.

## राष्ट्रवादी शरद पवार आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षांचे प्रबळ दावेदार नाही

मतदार संघात विद्यमान खासदार जरी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे असले तरी, पक्षाकडून प्रबळ दावेदार जवळपास नसल्याचं बोलले जात असून, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे ही बलाबल कमकुवत असल्याने अद्याप तरी उमेदवारीचा चेहरा पुढे आला नाही, त्याच्यामुळं सध्या तरी विद्यमान आमदार नमिता मुंदडा व काँग्रेसच्या उमेदवारीचे दावेदार तथा माजी मंत्री अशोकराव पाटील यांचे विश्वासू दत्ता कांबळे या दोघांच्या नावांची चर्चा मतदार संघात जोर धरू लागली आहे.



## माजी मंत्री अशोकराव पाटील जादूची कांडी फिरवू शकतात

केज मतदार संघात आगामी निवडणूके झाल्यास, पुढील निवडणुकीत मतदार संघ हा खुला होण्याची शक्यता वर्तवली जात असून, हा मतदार संघ कायम आपल्या संपर्कात राहण्यासाठी माजी मंत्री अशोकराव पाटील केज मतदार संघावार वर्चस्व असल्याने आघाडीतून पक्षाचे अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष व त्यांचे विश्वासू दत्ता कांबळे यांच्यासाठी सोडवून घेऊन, जादूची कांडी फिरवू शकतात अशी मतदार संघात चर्चा आहे



## आमदार नमिता मुंदडा वारसा हक्काने तर दत्ता कांबळे संघर्षातून

मतदार संघाच्या विध्यमान आमदार नमिता मुंदडा यांना स्वर्गीय विमलताई मुंदडा यांचा मोठा वारसा व भावनिकता लाभाल्यामुळं त्या आमदार असून, स्वकर्तृत्वचा कुठेही संबंध नसल्याचे जनमाणसातून बोलले जात असून, दुसरीकडे दत्ता कांबळे हे विध्यार्थी दशेपासून, दलित अन्याय अत्याचार, विध्यार्थी, सुशिक्षित बेरोजगार, सर्वसामान्य रुग्णांची सेवा, शेतकरी आंदोलन व आंबेडकरी चळवळीतून अठराविश्व् दारिद्यास शह देऊन संघर्षातून पुढे आलेलं नेतृत्व असल्यामुळे मतदार संघात दत्ता कांबळे यांच्या नावाने जोरदार चर्चा होताना दिसून येत आहे.

लोकसभा निवडणुकी नंतर राज्यातील जनतेची सर्वाधिक पसंती भारतीय काँग्रेस पक्षाला मिळाल्याने पक्ष श्रेष्ठी व पक्षाचा सामान्य कार्यकर्ता यांचा आत्मविश्वास चांगलाच वाढलेला दिसून येत आहे. अश्यातच मतदार संघात विद्यमान आमदार भाजपाचा असून, आत्ता भाजपा समोर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचेच तगडे आवाहन असल्याचे कोणीही नाकारू शकत नाही. कारण बीड लोकसभा क्षेत्रात येणाऱ्या सहा ही विधानसभा मतदार संघात स्थानिक राज्यसभेच्या खासदार रजनी पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जोरदार मोर्चे बांधणी सुरु केली आहे. तसेच भाजपाच्या विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांच्यावर सद्या अनेकांच्या नाराजी ओढवल्यामुळे, त्यांना मतदार संघात पसंती मिळेल अशी शक्यता सद्या तरी दर्शवता येत नाही, तर याच्या उलट दत्ता कांबळे हें भारतीय काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष म्हणून ते पक्ष्याचे अनुसूचित जातींचे नेतृत्व करतात , ते जिल्ह्यातील प्रत्येक अन्याय, अत्याचार, विद्यार्थी, शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार असे अनेक प्रश्नात हिरीरीने सहभागी होऊन कायम चर्चेत असतात. -

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल मध्ये कारगिल विजय दिवसानिमित्त वैयक्तिक गीत गायन स्पर्धांचे आयोजन

परळी(प्रतिनिधी) : दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल परळी वैजनाथ येथे दरवर्षीप्रमाणे कारगिल विजय दिवसानिमित्त वैयक्तिक गीत गायन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले . या प्रसंगी प्रशालेतील इयत्ता चौथी ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला .

यानुषांगणे आज प्रार्थमिक गटासाठी सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली, या स्पर्धेत इयत्ता चौथीतील कु.आरोही पाटील व कु.अंश राज यांनी प्रथम क्रमांक तर कु.आदित्य गित्ते व कु. श्रीरंग देशपांडे यांनी द्वितीय तर कु.अवणी मुंडे हिने त्रितीय क्रमांक प्राप्त केला. इयत्ता पाचवी मधिल कु.अनुश्री पुप्पलवार व कु. अक्षता रंजन यांनी प्रथम क्रमांक तर कु.श्लोक नानवते व कु.यशश्री दौंड यांनी द्वितीय तर कु.श्रावणी कांदे व कु. वेद चाटे त्रितीय क्रमांक प्राप्त केला. याप्रसंगी परीक्षक म्हणून बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायक व वादक श्री.दिनेश कुमार काळे सर (संगीत विशारद)व प्रशालेचे संगीत शिक्षक श्री. गणेश कांबळे सर त्याचबरोबर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.श्रीकांत पाटील सर व कलाविभाग प्रमुख श्री.प्रसाद देशपांडे सर यांची उपस्थिती तर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विषेश सहकार्य लाभले या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील उपजत गायन, वादन,नृत्य या कलागुणांना वाव मिळवा या उद्देशने वरील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.ऊषा किरण गित्ते तसेच प्रशालेचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक मा. श्री. किरण गित्ते साहेब (सचिव, नगरविकास सार्वजनिक बांधकाम उद्योग पर्यटन विभाग त्रिपुरा सरकार) त्याचबरोबर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. श्रीकांत पाटील यांनी केले.



# माजलगावात प्रशासकीय काळात झालेल्या बोगस सिमेंट रस्त्याच्या कामाची चौकशी लावण्यास

## आमदार साहेब कटिबद्ध राहणार का?-मा.नगराध्यक्ष शेख मंजूर


**माजलगाव प्रतिनिधी**

दि.25 माजलगाव नगरपरिषदेची प्रशासकीय इमारत,दर्जेदार सिमेंट रस्ते,पात्र लाभार्थ्यांपर्यंत घरकुल योजनांसह विविध माध्यमातून शहराचा विकास करण्याचा प्रयत्न सर्व सन्माननीय नगरसेवकांसह माझ्या नगराध्यक्ष पदाच्या काळात झाला आहे. त्यामुळे आमदार महोदयांनी या कामाचे श्रेय घेऊ नये.आमदार साहेबांना खरंच शहराच्या विकासाचा कळवळा असेल तर त्यांनी प्रशासकीय काळात झालेल्या बोगस सिमेंट रस्ते व ज्यांनी शासनाचा करोडो रुपयाचा निधी लुटला त्यांची चौकशी लावण्यास आमदार महोदय कटीबद्ध राहणार का?असा प्रश्न माजी नगराध्यक्ष शेख मंजुर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे. माजलगाव नगरपरिषदेत प्रशासकीय काळात आ.प्रकाश सोळंके यांनी आपल्या मर्जीतले मुख्याधिकारी नियुक्त करण्याचे काम केले आहे.या काळात संबंधित मुख्याधिकाऱ्यांनी शहराच्या विकास कामाची पूर्ती वाट लावली आहे.फक्त कागदावर कामे दाखवून किंवा थातूरमातूर कामे करून शासनाचा करोडो रुपयाचा निधी लुटण्याचे काम दरम्यानच्या काळात केले आहे. याबाबत आमदार महोदय चुप्पी साधून आहेत.या कामाची चौकशी आमदार साहेब लावणार आहेत का?दरम्यान माझ्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळत सर्व सन्माननीय नगरसेवकांच्या ठरावातून प्रशासकीय सुसज्ज इमारत उभी करण्याचे आम्ही काम केले आहे.दलित वस्ती,दलितोत्तर योजना अंतर्गत येणारा निधी शहरातील लोकसंख्येच्या नियमानुसार येतो. यातही आमदार साहेब श्रेय घेत आहेत.सिमेंट रस्ते,



पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या घरकुलाच्या योजना आम्ही पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याकामी मी उपोषणे,आंदोलने केली आहेत.माझ्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात झालेल्या कामाचे फुकटचे श्रेय आमदार साहेब घेत आहेत?इंदिरानगर भागात नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी एक कोटी रुपये निधी पंधराव्या वित्त आयोगातून आम्ही उपलब्ध केला होता.परंतु तो निधी मुख्याधिकाऱ्यांनी इतरत्र वळवला. त्यामुळे अद्यापही पाण्याच्या टाकीचे काम रखडले आहे.त्यामुळे या भागातील नागरिकांचे पाण्याविना हाल होत आहेत. सिंदफना नदीच्या सुशोभीकरणा साठी दोन वर्षापासून वीस कोटी रुपये मंजूर झाले,असे आमदार साहेब सांगतात.परंतु त्याचे अद्यापही काम सुरू झाले नाही. यावर आमदार साहेब काहीच बोलत नाहीत.माजलगाव शहरात प्रशासकीय काळात झालेले करोडो रुपयाचे रस्ते उखडले आहेत. रस्त्यावर खड्डे आहेत. शासनाचा निधी पाण्यात गेला आहे. जनतेला कसरत करत चालावे लागत आहे. आमदार साहेबांना शहरातील जनतेची काळजी असेल तर त्यांनी याबाबत आवाज उठवला पाहिजे. मर्जीतल्या कार्यकर्त्यांच्या वार्डात कामे केली जात आहेत.चांदनी ग्राउंड,फातिमा नगर,भोई गल्ली, कुरेशी गल्ली,झेंडा चौक,या भागात विकास निधी पोहोचत नाही.यामुळे भागातील नागरिकांचे हाल होत आहेत.कामाचे श्रेय घेण्यापेक्षा आमदार महोदयांनी जनतेच्या या होत असलेल्या हाल अपेष्टयांकडे लक्ष देण्याची अपेक्षा माजी नगराध्यक्ष मंजूर यांनी यावेळी केली आहे.

## साहेबराव नंदन लिखित परिसस्पर्श कादंबरी प्रकाशनाच्या वाटेवर




नाशिक [ वृत्तसेवा ] मुळगाव ताहाराबाद ता. बागलाण, जि. नाशिक येथिल रहिवासी ह. मु. नाशिकमध्ये स्थाईक असलेले, गावगाडाकार कवी लेखक संपादक अनेक पुरस्कारप्राप्त असलेले, श्री साहेबराव आनंदराव नंदन उर्फ तात्या ! यांच्या ग्रामिण लेखणीतून, ग्रामिण बाजातील ग्रामिण ढंगातील, रुढी प्रथा पंरपंराच्या वळन वाटेवरच्या, प्रयत्न वादातून ध्येयवाद साध्य करणाऱ्या, माहेरच्या समृद्धीत वाढलेली, सासरी भाळीच्या गोंदणावर गरीबीचं कुंकूची पदराला गाठ पडलेली,प्रसंगी पोट प्रपंचासाठी शेतीमातीत घामाच्या धारेत, न्हाऊन निघत, खडतर आयुष्याच्या संघर्षमय प्रवासातील सौभाग्यवतीच्या आयुष्यातील ,मनाचा ठाव घेणारी, उतकंठावर्धक ओघवत्या रसाळ शब्दालंकारांनी सजलेली, आसू आणि हसू, सुख आणि दुःख, गंधचंदनाच्या परिसस्पर्शी भावोत्कट वास्तविकता अधोरेखित केलेली, आत्मचरित्र वजा मुक्तेय निर्मित ज्ञानसिंधु प्रकाशन प्रकाशित परिसस्पर्श कादंबरी प्रकाशनाच्या वाटेवर असून लवकरच वाचक रसिकांची वाचनाची भूक भागवेल ह्यात शंकाच नाही. या आधी श्री साहेबराव नंदन यांचा गावगाडा काव्य संग्रह, सगर रत्न विशेषांक , सगर दिपोत्सव दिवाळी अंक , सगर सेवार्थी अंक सर्वच साहित्य राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त ठरले आहे.

# ९ ऑगस्टला हुतात्म्यांना अभिवादन!

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : राष्ट्रीय मिल मजदूर संघ आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाच्या संयुक्त विद्यमाने येत्या ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता, दरवर्षाप्रमाणे नाना चौक,अग्निशमनदल येथून गवालिया टँक, ऑगस्ट क्रांती मैदानावरील हुतात्मा स्मारकापर्यंत हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी गिरणी कामगारांची मूक मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष, माजी राज्यमंत्री





आमदार सचिनभाऊ अहिर, सरचिटणीस गोविंदराव मोहिते मूक मिरवणुकीचे नेतृत्व करतील. मूक मिरवणुकीत अन्य उद्योगातील कामगार कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होतील. रामिमसंघाच्या वतीने गेली ७५ वर्षे हा उपक्रम राबविला जात आहे. सघटनेचे खजिनदार निवृत्ती देसाई, उपाध्यक्ष रघुनाथ आण्णा शिर्सेकर, बजरंग चव्हाण, सुनिल बोरकर सेक्रेटरी शिवाजी काळे तसेच महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाचे उपाध्यक्ष राजन लाड, उत्तम गिते, सुनिल अहिर, मिलिंद तांबडे, संजय कदम, विजय काळोखे,किशोर रहाटे, साई निकम आदी पदाधिकारी मोर्चाच्या संयोजनात सहभागी होतील. संघटनेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री आमदार सचिनभाऊ अहिर सरचिटणीस गोविंदराव मोहिते ऑगस्ट क्रांती मैदानावरील हुतात्म्यांना पुष्पचक्र वाहून अभिवादन करतील, असे प्रसिद्धी प्रमुख काशिनाथ माटल यांनी कळवले आहे.

# रुग्ण हक्क संघर्ष समितीच्य मुंबई महिला संघटक प्रमुखपदी सुषमा अत्तरदे यांची निवड

( राजेंद्र चौधरी. मिरारोड )

रुग्ण हक्क संघर्ष समिती प्रमुख अँड विजय पंडित यांच्या अध्यक्षतेखाली २० जुलै रोजी पुणे शहर कार्यालयात झालेल्या बैठकीत सुषमा अत्तरदे यांची रुग्ण हक्क संघर्ष समितीच्या मुंबई महिला संघटक प्रमुखपदावर निवड करण्यात आली.



याप्रसंगी किरण पाचपांडे यांनी सुचवलेल्या रुग्ण हक्क संघर्ष समिती सदस्या, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या, विविध समाजहितार्थ उपक्रम राबविणा-या तसेच सामाजिक क्षेत्राराची आवड पाहून सुषमा शांताराम अत्तरदे यांची मुंबई महिला प्रमुखपदावर निवड करण्यात आली. यावेळी पुणे महिला प्रमुख मिनाक्षी शेटे, मुंबई विभागीय प्रमुख प्रशांत ढोणे, अंबरनाथ महिला तालुकाध्यक्षा सुजाता गायकवाड, संस्थापक सदस्य विश्वास कुलकर्णी, सहसचिव संतोष सोनवणे उपस्थित होते.

संघटक किरण बडे, जिल्हाध्यक्ष रवी गजे, महिला जिल्हाध्यक्षा मंगला अशोक जाधव, पिंपरी चिंचवड शहराध्यक्षा माधुरी कोलते, उपाध्यक्ष किरण पाचपांडे, पुणे शहराध्यक्ष संजय आगळे,कल्पना जाधव, राहूल ताटे, विशाल जाधव, रमजान मुलाणी, शशांक घाडगे, कार्यकर्ते

# सरसकट आरक्षण दिल्यास ओबीसी नेत्यांना पोटदुखी?

## महाजनांनी काय सांगितलं जरांगेच्या कानात? ; गौप्यस्फोट काय?

**विशेष /प्रतिनिधी**

राज्यात मराठा आणि ओबीसी समाजामध्ये वातावरण तापलेलं आहे. दोन्ही समाजामध्ये मोठा संघर्ष पाहायला मिळत आहे. मराठा समाजाचं नेतृत्त्व करणाऱ्या मनोज जरांगे यांनी सत्ताधारी आणि विरोधकांवर निशाणा साधला आहे. हे सगळे एका माळेचे मणी आहेत, फायदा असला की आम्हाला गोड बोलत असल्याचं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. इतकंच नाहीतर भाजप नेते गिरीष महाजन यांनी चर्चा करताना काय सांगितलेलं याबाबत जरांगे यांनी गौप्यस्फोट केलाय.

गिरीष महाजन डाव टाकतो आणि नंतर कायद्यात बसत नाही असं सांगत. गिरीश महाजन धोका देतो हे मला आधीच माहीत होते. सरसकट आरक्षण दिल्यास ओबीसी नेत्यांचे खूप दुखतंय असं गिरीश महाजन मला बोलले होते. सरकारने फसवले तरी



मराठ्यांच्या लेकरांसाठी पुन्हा मी माझ्या जीवाची बाजी लावायला तयार आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

मराठा समाजाचा जीव आरक्षणात आहे हे सरकारच्या लक्षात आले आहे. त्यामुळे सरकारने ठरवले आहे मराठ्यांना आरक्षण द्यायचे नाही, मग आता मराठा समाजानेही ठरवले आहे की यांचा जीव सत्तेत आहे तर मग यांना सत्ताच द्यायची नाही. सरकारने आरक्षण दिले नाही तर मला माझ्या समाजाला सत्तेत बसवल्याशिवाय पर्याय नाही आणि यांना पडल्याशिवाय पर्याय नसल्याचं जरांगे म्हणाले.

शरद पवार आणि सरकार काय करतायत कळत नाही. हे सगळे एका माळेचे मणी आहेत, फायदा असला की आम्हाला गोड बोलतात, सध्या विरोधी आणि सत्ताधारी यांनी काहीच सुचत नाही, यांचे नुकसान झाल्यावर यांना कळेल सगळं, माझा समाज यांना धडा शिकवणार आहे. दिल्लीत नाहीत आणखी कुठं नेतील काहीही बोलतात, राज्यात कुणबी मराठा एक आहे, सगळं सारख आहे त्यामुळे आरक्षण दिलं पाहिजे. सगे सोयरे जर टिकत नाही तर मग जज आमच्याकडे कशाला आले होते? मराठा समाजाची एक नोंद सापडली तर त्याच्या आधारे संपूर्ण महाराष्ट्रातील मागेल त्या मराठ्याला कुणबी प्रमाणपत्र दिली पाहिजे, तुम्ही त्यावेळी हे का मान्य केलं? असा सवाल जरांगेंनी केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

रविवार २८ जूले २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# ग्रामीण रुग्णालयाला स्वत:ची खाजगी मालमत्ता समजणाऱ्या डॉ. किशोर रत्नपारखी यांच्याकडून रुग्णांची हेडसांड व नातेवाईकांना आरेराविची भाषा

**तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी अशा मुजोर व जातीवादी मानसिकता असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना वेळीच आवर घालावा व ग्रामीण रुग्णालयात जो प्रकार सुरू आहे त्या प्रकाराची सखोल चौकशी करून अशा कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखवावा अशी मागणी आता सर्वसामान्य जनतेच्या चर्चेतून होताना दिसून येत आहे. उच्च विचारसरणी व रुग्णांबद्दल आत्मीयतेने वागणाऱ्या ग्रामीण रुग्णालय येथीलच शिस्तप्रिय, लोकप्रिय डॉ.गजानन रुद्रवार यांचा कडून शिस्तीचे धडे घेण्याची गरज आज तरी डॉ. किशोर रत्नपारखी यांना आहे .**

माजलगाव प्रतिनिधी डॉ. हे देवाचे रूप आहे या प्रमाणे सर्वसामान्य लोक हे डॉक्टरांना देवाच्या रूपात पाहतात पण माजलगाव ग्रामीण रुग्णालयातील डॉ. किशोर अ. रत्नपारखी (एम. डी . होमोआर्पेथिक तज्ञ ) हे मात्र या गोष्टीला अपवाद ठरलेले आहेत. त्यांनी माजलगाव ग्रामीण रुग्णालयाला आपली स्वत:ची क्लिनिक असल्यासारखे रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना ते आपल्या मगरूर स्वभावाने निकृष्ट दर्जाची हिन





वागणूक देत आसल्याचे सर्व सामान्य लोकांच्या चर्चेतून बोलले जात आहे. ग्रामीण रुग्णालयात अगोदरच वेगवेगळ्या वस्तूंचा अभाव असल्याने या रुग्णालयाकडे येणाऱ्यांची संख्या ही कमी झालेली आहे .पण ज्या रुग्णांना आपल्या परिस्थितीनुसार खाजगी रुग्णालयात उपचार करणे शक्य नाही असे गोरगरीब लोक ग्रामीण रुग्णालयाचा मार्ग स्वीकारतात मात्र माजलगाव ग्रामीण रुग्णालयातील डॉ. किशोर रत्नपारखी हे अशा गोरगरीब असाह्य रुग्णांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करत आहेत असे बोलले जात आहे .या वरून त्यांची मानसिकता ही किती जातीवादी स्वरूपाची आहे हे आता समोर येत आहे या डॉ.कडून रुग्णालयात गेलेल्या कित्येक लोकांना तुम्ही कुठल्या जातीचे आहेत असे विचारले जाते. त्यातून त्यांची मानसिकता ही किती जातीवादी स्वरूपाची आहे हे दिसून येते जर दलित ,ओबीसी समाजाचे सांगितले तर त्यांची जातीवादी मानसिकता बाहेर येते व ते रुग्णांना लांब थांबण्याचा सल्ला देतात किंवा उद्धट भाषा वापरून हाकलून लावतात आशा प्रकारची चर्चा आता सर्व माजलगाव परिसरात दिसत आहे.

## ऋता रानडे आणि वैशाली बागडे यांना आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार.

..मुंबई प्रतिनिधी...गणेश हिरवे...कुर्ला पूर्व पंत वालावलकर माध्यमिक विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका ऋता रानडे आणि वैशाली बागडे या दोन्ही विद्यार्थी प्रिय शिक्षिकांना नुकताच जॉय सामाजिक संस्था मुंबई यांचे वतीने संस्थापक गणेश हिरवे यांनी आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार देऊन सन्मानित केले. या दोघीही शिक्षिका साधारण २० ते २५ वर्षापासून शाळेत शिकवत असून ऋता रानडे गणित विज्ञान तर वैशाली बागडे हिंदी व समाजशास्त्र शिकवतात. आजपर्यंत जे जे विद्यार्थी यांच्या हाताखालून शिकले ते आज विविध ठिकाणी उच्च पदावर कार्यरत आहेत.सामाजिक कार्यात देखील या शिक्षिका नेहमीच पडद्याआड राहून अनेकांना सहकार्य करीत असतात.दोघीही प्रेमळ,सुस्वभावी असून आपल्या मिळकतीतील काही भाग हा समाजातील दुर्बल, वंचित आणि दारिद्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांसाठी कायमच उपयोगात आणत असतात. हा त्याचा विशेष गुण आहे.पुरस्कार मिळाल्याने दोन्ही शिक्षकांचे अनेकांनी भेटून अभिनंदन केले असून त्या अमच्या जॉय संस्थेच्या सभासद असल्याचा आम्हाला अभिमान असल्याचे गणेश हिरवे म्हणाले.

## विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रात नवीन राज्यपालांची नियुक्ती, झारखंडचे राज्यपाल स्वीकारणार पदभार





झारखंडचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती झाली आहे. काल मध्यरात्री एकच्या सुमारास दहा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील राज्यपालांच्या बदल्या आणि नियुक्तीबद्दल एक परिपत्रक जारी करण्यात आले. देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी विविध राज्यात नवीन राज्यपालांची नियुक्ती केली आहे.शनिवारी मध्यरात्री उशिरा राष्ट्रपती भवनाकडून याबद्दलचे परिपत्रक जारी करण्यात आले. या परिपत्रकात नवीन राज्यपालांची नावे जाहीर करण्यात आली. यानुसार सी पी राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे नवे राज्यपाल असणार आहेत. राधाकृष्णन हे रमेश बैस यांच्या जागी पदभार स्विकारणार आहेत. सध्या ते झारखंडचे राज्यपाल आहेत. तर झारखंडच्या राज्यपालपदाची जबाबदारी संतोषकुमार गंगवार यांच्याकडे सोपविण्यात येईल. त्यासोबतच भाजपचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडेंची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली

## नीलम गायकवाड यांना उपक्रमशील शिक्षक पुरस्कार

## सुमतीबाई गोरे ट्रस्टचे राज्यस्तरीय उपक्रमशील शिक्षक पुरस्कार जाहीर



**ता. 24 पुणे प्रतिनिधी**

सुमतीबाई गोरे ट्रस्टचे राज्यस्तरीय उपक्रमशील शिक्षक पुरस्कार नुकताच जाहीर झाला असून पुणे येथील खुळेवाडीत मनपा शाळा क्रमांक 91 मुलांच्या शाळेतील उपक्रमशील शिक्षिका नीलम विनायक गायकवाड यांना उपक्रमशील शिक्षक पुरस्कार जाहीर झाला असल्याचे संयोजक सोपान बंदावणे व कार्यकारी विश्वस्त राधाताई शिरसेकर यांनी सांगितले. सामाजिक शैक्षणिक पुस्तकांचा संच, आकर्षक स्मृतिचिन्हे, शाल, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सुमतीबाई गोरे ट्रस्टच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून राज्यातील उपक्रमशील शिक्षकांना उपक्रमशील शिक्षक पुरस्कार देऊन प्रोत्साहित करण्यात येते. प्रस्ताव मागवून पारदर्शक पद्धतीने निवड होत असल्याने शैक्षणिक क्षेत्रात हा एक मानाचा पुरस्कार समजण्यात येतो. सामाजिक उत्तरदायित्व,साहित्यिक योगदान, सामाजिक योगदान, समाजासाठी केलेले आर्थिक योगदान, वाढवलेली शैक्षणिक पात्रता, सर्जनशीलता, शैक्षणिक क्षेत्रात इतरांपेक्षा वेगळे काम करणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांना हा पुरस्कार देण्यात येतो. त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रात आदर्श काम करणाऱ्या दोन कार्यकर्त्यांना व महाराष्ट्रात आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवणाऱ्या एका समाजशिक्षकालाही पुरस्कार देण्यात येतो. उपयुक्त अशा सामाजिक शैक्षणिक पुस्तकांचा संच, आकर्षक स्मृतिचिन्ह,शाल, सन्मानपत्र व पूष्पगूच्छ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार समारंभ दत्तात्रय वारे ( वाबळेवाडी झिरो एनर्जी शाळा) यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रसिद्ध लेखिका इंदुमती जोंधळे यांच्या अध्यक्षतेखाली ११ ऑगस्ट २०२४ रोजी उद्यान कार्यालय सदाशिव पेठ , पुणे येथे दुपारी ३ वा संपन्न होणार असल्याची माहिती प्रकल्प प्रमुख सोपान बंदावणे,कार्यकारी विश्वस्त राधाताई शिरसेकर यांनी दिली. सदर परीक्षण अनिल आंधळे, रजनीताई धनकवडे, ज्योती मते यांनी केले. तसेच समारंभाची तयारी किरीटी मोरे, प्रभाताई गोगावले,ॲड सुधीर निरफराके,ॲड जाकीर अत्तार, राजेंद्र जठवडेकर, संजय ससे, संगिता गोवळकर, आशालता जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com